# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात दान महोत्सवाची सांगता

महाड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दिनांक २ आक्टोबर ते ३० ऑक्टोबर या कालावधीत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त महाविद्यालयात दान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रगल्भ सामाजिक वारसा व बांधिलकी असलेल्या या महाविद्यालयात या दान महोत्सवाला भरभरून प्रतिसाद मिळाला. विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने २० पोती कपडे १३ छत्र्या व ५३ पुस्तकांचे दान जमा करण्यात स्वयंसेवकांना यश आले या सर्व गोष्टीचे वाटप पुढील ३ महिने सलग महाड मधील १० गावांमध्ये करण्यात आले यात प्रामुख्याने दिवाळीत रायगड रोड वरील पाच गावामध्ये सर्वाधिक वस्तूंचे वाटप लोकांसाठी विशेष स्वरूपात आर्थिक मदत गोळा करण्यात आली त्यात विद्यार्थ्यांनी रू १७,१२१/- व प्राध्यापक आणि इतर कर्मचार्यांनी रू ६०००/- असे एकूण २३,१२१/- रू. मदत निधी दिला तसेच दिव्यांग साहसी शिबिरासाठी रायगड किल्ल्यावर जमा झालेल्या लोकांसाठीही स्वयंसेवकांनी रू ७,५००/- गोळा करून दिले

सलग चार महिने यशस्वीरित्या महाविद्यालयात पार पडलेल्या या दान महोत्सवाचे श्रेय संपूर्णपणे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव यांना जाते. स्वत: १ पोतेभरून कपडयांचे दान या महोत्सवात करून त्यांनी विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवला. त्यांच्याच मार्गदर्शनाने हा दान महोत्सव एवढया मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांकडून आयोजित झाला.